स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
नांदेड– ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY
NANDED-431606, MAHARASHTRA STATE, INDIA.
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.
Established on 17th September 1994 - Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade



**SPECIAL CELL**

**Phone: (02462) 229245**
**Fax : (02462) 229574**
**Website: www.srtmun.ac.in**
**E-mail: splecellsrtmun@gmail.com**

जा.क्र./विशेष कक्ष/परिपत्रक/२०१५.२०१६/ १६१८ दिनांक : ०५.०१.२०१६.

**प्रति,**
मा.प्राचार्य,
सर्व संलग्नित अशासकीय महाविद्यालये,
**प्रस्तुत विद्यापीठ.**

**विषय : शासन निर्णय दिनांक २४.०४.१९९५ अन्वये शिक्षक संवर्गाच्या पदाची संवर्ग व विषयनिहाय बिंदुनामावली नोंदवही तयार करून प्राथमीक पडताळणी करून घेणे बाबत.**

**संदर्भ :-** ०१.शासन निर्णय क.न्यायाप्र-२०१४/(प्र.क.३२१/१४)/विशि-१ दिनांक २४.०८.२०१५.
०२. या विभागाचे परिपत्रक क.विक/२०१५.१६/१४०५, दिनांक २४.०९.२०१५.

**महोदय,**

उपरोक्त संदर्भीय क.०१ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील अकृषी विद्यापीठे/शासकीय महाविद्यालये/संस्था, अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित महाविद्यालयातील शिक्षकीय पदांना शासन निर्णय दिनांक २४.०४.१९९५ अन्वये संवर्ग व विषयनिहाय आरक्षण ठेवण्याबाबत कळविण्यात आले आहे.

याबाबत आपणास कळविण्यात येते की, संदर्भीय क.०२ अन्वये प्रस्तुत विद्यापीठ कार्यक्षेत्रातील संस्था/महाविद्यालयांनी दिनांक २४.०४.१९९५ रोजीच्या शासन निर्णयानुसार व शासन निर्णय दिनांक २९.०३.१९९७ नुसार विहित केलेल्या १०० बिंदुनामावलीनुसार शिक्षक संवर्गाच्या पदाच्या सुधारीत संवर्ग व विषयनिहाय बिंदुनामावल्या तयार करून आवश्यक त्या कागदपत्रासह विशेष कक्ष विभागात सादर कराव्यात असे कळविण्यात आले होते. त्यानुसार ब-याच संस्था/महाविद्यालयानी सदरील शासन निर्णयानुसार सुधारित बिंदुनामावल्या तयार करून शासन परिपत्रक दिनांक ०५.११.२००९ मधील तरतुदीनुसार प्राथमिक पडताळणी करून

:::०२ :::

मा.सहा.आयुक्त (मावक),आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडे अंतीम पडताळणीसाठी अग्रेषीत केलेल्या आहेत. सदर कार्यालयाकडून अंतीम पडताळणी झाल्यानंतर शिक्षक संवर्गाची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही चालू आहे. परंतु ब-याच संस्था/महाचिद्यालयांकडून सदर शासन निर्णयानुसार कार्यवाही केलेली दिसून येत नाही. तथापि शासनाकडून वेळावेळी शिक्षक संवर्गाच्या पदाबाबतची माहिती मागविण्यात येत आहे.

तेंव्हा वरील बाबीस प्रथम प्राधान्य देवून आपल्या संस्था/महाविद्यालयातील शिक्षक संवर्गाच्या पदाच्या संदर्भ क.०१ अन्वये सुधारीत बिंदुनामावल्या तयार करुन शासन परिपत्रक दिनांक ०५.११.२००९ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी व रिक्त पदे भरण्याबाबतची पुढील योग्य ती कार्यवाही करुन विद्यापीठास सहकार्य करावे. ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत/-

**संचालक**

महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ